महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,

ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/ एनजीसी/एमबीए/मान्यता/(१९१/२०२०)/ 805 दिनांक: 14 OCT 2020

प्रति,
प्राचार्य,
यशस्वी एज्युकेशन सोसायटीचे इंटरनॅशनल इन्स्टिटयूट
ऑफ मॅनेजमेंट सायन्स सर्व्हे नं.१६९/१/ए, एल्प्रो
इंटरनॅशनल समोर, चिंचवड, पुणे - ४११ ०३३

(डीटीई संकेतांक - ६७७५)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान संस्थेत सुरू असलेल्या अभ्यासक्रमाची तुकडी पूर्ण करण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०२०/प्र.क्र.१०२/तांशि ४, दि. १३.०८.२०२०

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शै.व. २०२०-२१ पासून कायम विना-अनुदान तत्वावर विद्यमान संस्थेत सुरू असलेल्या अभ्यासक्रमाची तुकडी पूर्ण करण्यास खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | एमबीए | ९०-१२० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान संस्थेत सुरू असलेल्या अभ्यासक्रमाची तुकडी पूर्ण करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, या संचालनालयाने, **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. वरील अभ्यासक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संबंधित शिखर संस्था/परिषद/ नियामक मंडळ/ प्राधिकरण महाराष्ट्र शासन इ. यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेल्या व येणा-या नियमांचे पालन करणे त्याचप्रमाणे तेवढया अर्हताधारक संचालक, अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी यांची नियुक्ती करणे तसेच आवश्यक ते निधी स्थापित करणे व ठेवणे आपल्या संस्था/परिसंस्थेवर बंधनकारक राहील या अटीच्या आधारे देण्यात आलेल्या मान्यतेच्या आधारे मान्यता देण्यात येत असून याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

६. संबंधित प्राधिकरणाचे आग प्रतिबंधक नाहरकत प्रमाणपत्र ३ महिन्यांच्या आत या कार्यालयास सादर करावे.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे नोंदणी केल्याशिवाय प्रस्तूत अभ्यासक्रमांस प्रवेश करण्यात येऊ नयेत.

२. मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४. कार्यासन क्र. २अ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कायांसन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.